| MHJN020004172025 | नि.दि.वा.क्र.१०१/२०२३<br>सत्यविजय–वि–नबाबराव व ईतर |
|---|---|

**निशाणी क्र.०५ वरील आदेश**

**(दि.११.०३.२०२५ रोजी घोषीत)**

. वादी/अर्जदार प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या विरुध्द् सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता,आदेश ३९ नियम १ व २ अन्वये अंतरिम मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**वादी यांचे अर्जातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणेः–**

२. वादी/अर्जदार यांचे कथन की,मौजे बाभुळगाव,ता.भोकरदन,जि. जालना येथील जमीन गट नं.२४५ ज्याचे एकुण क्षेत्रफळ ०७हे.७८आर. पोटखराब ०४आर यापैकी ८२आर. जमीन ही हिंदु एकत्र कटूंबाची वडीलोपार्जीत अविभाजीत मालकी व ताब्याची आहे आणि त्यामध्ये वादीचा हिस्सा आहे. तसेच प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ यांच्या हक्कात बोगस व बनावट खरेदीखत क्र.६४३५/२०२४ दि.२६.११.२०२४ रोजी वादीच्या माघारी व संमतीशिवाय विनामोबदला विना ताबा करुन दिलेले असून ते वादीच्या हक्कांवर बंधनकारक नसल्यामुळे रद्यबातल करण्यासाठी प्रस्तुत दावा दाखल केलेला आहे.

३. वादीचे कथन की,प्रतिवादी क्र.२ हे वादीचे वडील असून प्रतिवादी क्र.१ हे सेवानिवृत्त नायब तहसीलदार आहेत. वर नमूद मिळकतीवर वादी व त्याचे

वडील यांची आजही ताब्याआधारे वहिती आहे. परंतु खरेदीखत क्र.६४३५/२०२४ हे विना मोबदला,विना ताबा आणि चूकीच्या चतुःसिमा नमूद करुन प्रतिवादी क्र.२ ची फसवणूक व दिशाभूल करुन नोंदणीकृत केलेले आहे. वादीने अर्जामध्ये नमूद केलेल्या वंशावळीप्रमाणे वाद मिळकत ही हिंदु एकत्र कुटूंबाची अविभाजीत मिळकत आहे.

४. वादीचे कथन की,प्रतिवादी क्र.१ च्या पत्नीचे व प्रतिवादी क्र.२ यांच्या शेतातील गट क्र.२४६ ला जाण्यासाठी गट क्र.२४५,२४६,२४७,२४८ व २५० च्या नंबर बांधाने रस्त्या संदर्भात तहसीलदार,भोकरदन यांच्याकडे सी.आर.क्र.१२/२०२० अन्वये प्रकरण चालु होते. सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांच्यामध्ये तडजोडपत्र दाखल करण्याचे ठरले होते. परंतु प्रतिवादी क्र.२ हे व्यसनाधीन असल्याचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी क्र.१ ने बोगस, बनावट,विना मोबदला व चुकीच्या चतुःसिमा दर्शवून खरेदीखत करुन घेतलेले आहे. सदर खरेदीखत वादीच्या हक्कावर बंधनकारक नसून ते रद्यबातल करणे न्याय व जरुरीचे आहे. करीता वादीने दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत अंतरिम एकतर्फा तुर्तातूर्त मनाई हुकूम आदेश पारीत करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

५. अभिलेखावरील कागदपत्राचे अवलोकन केले.

६. वादीच्या विधिज्ञांचा युक्तीवाद श्रवण.

७. वादीने दाखले केलेले वादपत्र आणि नि.क्र.४ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता वाद मिळकत ही वडीलोपार्जीत व अविभाजीत हिंदु एकत्र कुटूंबाची आहे आणि त्यामध्ये वादीचा हिस्सा आहे हया बाबी साक्षीपुराव्याचा भाग आहे. तसेच प्रतिवादी क्र.२ ने प्रतिवादी क्र.१ यांच्या नावे वादीच्या माघारी व विना संमती खरेदी–खत क्र.६४३५/२०२४,दि. २६.११.२०२४ रोजी करुन दिले,जे रद्दबातल करणे हा भाग देखील साक्षीपुराव्याचा भाग आहे. सद्द परिस्थितीमध्ये वादीने त्यांची बाजू प्रथमदर्शनी सिध्द् केलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी विरुध्द् जैसे–थे (Status-Quo) आदेश पारीत केल्यास कोणतेही नुकसान होणार नाही. करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | प्रतिवादी क्र.१ यांनी मौजे बाभुळगाव,ता.भोकरदन,जि.जालना येथील गट नं.२४५ ज्याचे एकुण क्षेत्रफळ ०७हे.७८ आर. पोटखराब ०४आर यापैकी ८२आर.जमीन विक्री,हस्तांतरण अथवा त्रयस्थ व्यक्तीचे हक्क प्रस्थापित करु नये असा प्रतिवादी क्र.१ यांच्या विरुध्द् ते हजर होईपर्यंत जैसे–थे (Status-Quo) आदेश पारीत करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| २ | प्रतिवादी क्र.१ व २ यांना नोटीस जारी करण्यात येते की,त्यांच्या विरुध्द् एकतर्फा तात्पुर्ता मनाई हुकूम कायम का करण्यात येऊ नये. |
| ३ | वादी याने दिवाणी प्रक्रिया संहिता,आदेश ३९ नियम ३ (अ) व (ब) चे पालन करावे. |
| ४ | प्रतिवादींना जारी करण्यात आलेल्या नोटीसा या दि.०२.०४.२०२५ पर्यंत उलट टपाली या न्यायालयात पाठविण्यात याव्या. |

DILIP SHANKARRAO THORAT

Digitally signed by DILIP SHANKARRAO THORAT
Date: 2025.03.12 10:57:22 +0530

(दिलीप शं.थोरात)

दि.११.०३.२०२५

दिवाणी न्यायाधीश(व.स्तर)
जालना

**प्रमाणपत्र**

मी शपथेवर निवेदन करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : शिरीष दि.देशमुख

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), जालना.

अपलोड केल्याची तारीख : दि.११.०३.२०२५

लघुलेखक(म)